INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 12 | JANUARY – 2026

# यवतमाळ जिल्ह्यातील शेतमजुरांकरिताशासनाद्वारे राबविल्या जात असलेल्या योजनांचा अभ्यास

**श्री. नीलेश ब. जाधव**
संशोधनकर्ता

**डॉ. मारोती बी. राठोड**
मार्गदर्शक ,
शिवरामजी मोघे कला , वाणिज्य व विज्ञान महाविधालय, पांढरकवडा, जि. यवतमाळ

## सारांश

सारांश असा की, २०१२-१३ ते २०२१-२२ या कालावधीत यवतमाळ जिल्ह्यातील शेतीमजुरांची आर्थिक स्थिती हे केवळ एक संशोधनाचे विषय नसून सामाजिक न्याय, आर्थिक समतोल आणि ग्रामीण विकास या तिन्ही अंगांनी महत्त्वाचे प्रकरण आहे. या अभ्यासाचे निष्कर्ष धोरणकर्ते, शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ आणि विकास अभ्यासक यांना मार्गदर्शन करणारे ठरतील आणि भविष्यातील योजनांमधून या असुरक्षित वर्गाचे जीवनमान उंचावण्यासाठी ठोस उपाययोजना राबविण्यात मदत करतील.



## प्रस्तावना

ग्रामीण भारतातील शेतमजूर हा आर्थिकदृष्ट्या अत्यंत दुर्बल आणि सामाजिकदृष्ट्या दुर्लक्षित असा घटक मानला जातो आणि यवतमाळ जिल्ह्यात ही स्थिती ठळकपणे आढळून येते. जिल्ह्याची अर्थव्यवस्था मुख्यतः कृषीवर अवलंबून असली, तरी शेती उत्पादनात मोलाचे योगदान देणाऱ्या या कामगारांना सातत्याने दारिद्र्य, अनिश्चित रोजगार, वेतनातील अस्थिरता, मर्यादित सौदेबाजीची क्षमता तसेच कल्याणकारी योजनांचा अपुरा लाभ अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. हंगामी स्वरूपाची कामाची उपलब्धता, शेतीतील यांत्रिकीकरण, वारंवार येणारे दुष्काळ, पीक अपयश आणि कृषी उत्पादनातील चढ-उतार यांमुळे त्यांच्या जीवनमानात मोठी अनिश्चितता निर्माण झाली आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील शेती मोठ्या प्रमाणावर मान्सूनवर अवलंबून असल्याने आणि हवामानाशी संबंधित जोखमी अधिक असल्याने, शेतमजुरांना दीर्घकाळ बेरोजगारी तसेच उपजीविकेसाठी स्थलांतर करण्याची वेळ येते. अल्प वेतन, लिंगाधारित वेतन विषमता, वाढते कर्जभार, निकृष्ट राहणीमान आणि बचतीच्या मर्यादित संधी या बाबी त्यांच्या आर्थिक अस्थिरतेला अधिक तीव्र करतात. ग्रामीण कुटुंबांना आधार देण्यासाठी विविध शासकीय योजना अस्तित्वात असल्या, तरी माहितीचा अभाव, अंमलबजावणीतील त्रुटी आणि योजनांपर्यंत पोहोचण्यातील अडचणी यांमुळे या योजनांचा अपेक्षित लाभ शेतमजुरांपर्यंत पोहोचत नाही.

ग्रामीण अर्थव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण योगदान असूनही, यवतमाळ जिल्ह्यातील शेतमजुरांच्या प्रत्यक्ष आर्थिक स्थितीबाबत पुरेशी अनुभवजन्य माहिती उपलब्ध नाही. विद्यमान अभ्यासांमध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांवर लक्ष केंद्रित केले गेले असून, भूमिहीन व अल्पभूधारक मजुरांच्या समस्यांकडे तुलनेने दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नाचे स्वरूप, रोजगाराचे प्रकार, खर्चाची रचना, शासकीय योजनांमध्ये सहभाग आणि आर्थिक सुरक्षिततेवर परिणाम करणारे घटक यांचा सखोल, पद्धतशीर अभ्यास करणे अत्यावश्यक ठरते.

या पार्श्वभूमीवर, प्रस्तुत अध्ययनामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील शेतमजुरांच्या आर्थिक परिस्थितीचे विश्लेषणात्मक परीक्षण करण्यात येणार असून, त्यांच्या उपजीविकेला अडथळा ठरणाऱ्या प्रमुख समस्या ओळखणे आणि त्यांच्या जीवनमानावर प्रभाव टाकणाऱ्या सामाजिक-आर्थिक घटकांचे आकलन करणे हा या अभ्यासाचा मुख्य उद्देश आहे. या दुर्लक्षित ग्रामीण घटकाच्या जीवनस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी पुराव्यावर आधारित उपाययोजना व धोरणात्मक शिफारसी मांडण्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरेल.

अलीकडच्या काळात भारत औद्योगिक प्रगतीच्या दिशेने पुढे जात असला, तरी ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचा पाया आजही मुख्यत्वे कृषी क्षेत्रावर आधारित आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या घटकांमध्ये शेतमजुरांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरते. स्वातंत्र्यानंतर देशाच्या सर्वांगीण विकासासाठी पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी करण्यात आली असून आजपर्यंत एकूण तेरा पंचवार्षिक योजना राबविण्यात आल्या आहेत. मात्र या योजनांमध्ये उद्योग क्षेत्राला अधिक प्राधान्य देण्यात आलेले दिसून येते, तर देशातील सुमारे सत्तर टक्के लोकसंख्येला आधार देणाऱ्या कृषी क्षेत्राला तुलनेने दुय्यम महत्त्व मिळाले आहे.

यवतमाळ जिल्ह्यात शेती हा प्रमुख व्यवसाय असला, तरी येथील शेती प्रामुख्याने कोरडवाहू स्वरूपाची आहे. जिल्ह्यात काही प्रमाणात सिंचनाची व्यवस्था उपलब्ध असली, तरी ती अपुरी असल्यामुळे शेतकरी आजही अनिश्चित आणि अस्थिर शेती उत्पादनावर अवलंबून आहे. अरुणावती, अडाण, बेंबळा, चिरकूटा, आंतरगाव, पाथरड आणि इसापूर यांसारखे मोठे व मध्यम सिंचन प्रकल्प जिल्ह्यात अस्तित्वात आहेत; परंतु या प्रकल्पांपैकी कोणताही प्रकल्प अपेक्षित प्रमाणात सिंचन सुविधा पुरवू शकलेला नाही. उदाहरणार्थ, सन १९७० पासून कार्यरत असलेला अडाण हा जुना प्रकल्प आजतागायत अपेक्षित सिंचन क्षेत्र गाठण्यात अपयशी ठरलेला आहे.

शेतमालाला योग्य दर मिळावा यासाठी आवश्यक असलेल्या सुविधा यवतमाळ जिल्ह्यात अपुऱ्या असल्यामुळे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. यामध्ये रेल्वे वाहतुकीचा अभाव ही एक गंभीर अडचण ठरते. शेतमाल दूरच्या बाजारपेठांपर्यंत पोहोचविण्यासाठी रेल्वे मार्ग हे प्रभावी दळणवळणाचे साधन असते; मात्र यवतमाळ जिल्ह्याला आजपर्यंत रेल्वे मार्गाचा लाभ मिळालेला नाही. परिणामी, जिल्ह्यातील शेती क्षेत्र आर्थिकदृष्ट्या मागास राहिल्याचे स्पष्ट होते.

या परिस्थितीमुळे यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी सातत्याने शेतमालाच्या योग्य किंमतीपासून वंचित राहिला आहे. त्याचा थेट परिणाम शेतमजुरांच्या जीवनमानावर होत असून त्यांना दारिद्र्यग्रस्त परिस्थितीत जीवनजगावे लागत आहे.

खऱ्या अर्थाने देशाचा आर्थिक आणि सामाजिक विकास साधायचा असल्यास राष्ट्रीय उत्पादनात वाढ होणे आवश्यक आहे. या उत्पादनवाढीत श्रमिक आणि मजुरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. राष्ट्रीय उत्पन्न वाढल्यास दरडोई उत्पन्नात वाढ होते आणि त्यामुळे मजुरांची क्रयशक्ती वाढते. म्हणूनच दरडोई उत्पन्न वाढविण्याचा विचार करताना शेतमजुरांच्या उत्पन्नाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. कारण शेतीचा, आणि त्याअनुषंगाने देशाच्या विकासाचा आधार शेतमजुरांवरच अवलंबून आहे. त्यामुळे शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा सखोल आणि चिकित्सक अभ्यास करणे अत्यावश्यक ठरते.

**सारणी क्रमांक १:**
**शेतमजुरांसाठी असलेल्या सरकारी योजनांची माहिती असण्यासंबंधी यवतमाळ जिल्ह्यातील शेतमजुरांच्या प्रतिक्रिया**

| **प्रतिक्रिया** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ३३२ | ५२.४ |
| नाही | ३०२ | ४७.६ |
| **एकूण** | **६३४** | **१००** |
| **काई वर्गमूल्य** | **स्वातंत्र्यांश** | **P मूल्य** |
| १.४२ | १ | ०.२३३ (NS) |

सारणी क्रमांक १ मध्ये शेतमजुरांसाठी असलेल्या सरकारी योजनांची माहिती असण्यासंबंधी यवतमाळ जिल्ह्यातील शेतमजुरांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील ५२.४% शेतमजुरांना शेतमजुरांसाठी असलेल्या सरकारी योजनांची माहिती असून ४७.६% शेतमजुरांना शेतमजुरांसाठी असलेल्या सरकारी योजनांची माहिती नसल्याचे दिसून आले.

नॉन पॅरामेट्रिक काई वर्ग चाचणीचे परिणाम दर्शवितात की अध्ययन क्षेत्रातील शेतमजुरांची शेतमजुरांसाठी असलेल्या सरकारी योजनांची माहिती असण्यानुसार तुलना केली असता, त्यांच्या दरम्यान सार्थक (काईवर्ग = १.४२; स्वातंत्र्यांश =१ ; P =०.२३३ (NS)) अंतर नाही. उपरोक्त माहितीवरून असे निदर्शनास येते की यवतमाळ जिल्ह्यातील बहुतांश शेतमजुरांना शेतमजुरांसाठी असलेल्या सरकारी योजनांची माहिती आहे.

**सारणी क्रमांक २:**
**यवतमाळ जिल्ह्यातील शेतमजुरांची माहित असलेल्या सरकारी योजनांच्या यादीसंबंधीमाहिती**

| योजना | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (MGNREGA) | २४३ | ७३.२ |
| प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISAN) | १८५ | ५५.७ |
| राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY) | १४१ | ४२.५ |
| पीक विमा योजना (प्रधानमंत्री फसल विमा योजना) | १३८ | ४१.६ |
| आरोग्य विमा योजना (आयुष्मान भारत / महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना) | १३२ | ३९.८ |
| कृषी कामगारांसाठी पेन्शन योजना | १२४ | ३७.३ |
| इतर | ९८ | २९.५ |

सारणी क्रमांक २ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील शेतमजुरांची माहित असलेल्या सरकारी योजनांच्या यादीसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार यवतमाळ जिल्ह्यातील ७२.३% शेतमजुरांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (MGNREGA) यासंबंधी माहिती असून ५५.७% शेतमजुरांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISAN) संबंधी माहिती आहे. तसेच राष्ट्रीय कृषीविकास योजना (RKVY), पीक विमा योजना (प्रधानमंत्री फसल विमा योजना), आरोग्य विमा योजना (आयुष्मान भारत / महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना) व कृषी कामगारांसाठी पेन्शन योजना यासंबंधी माहिती असणार्या शेतमजुरांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे ४२.५%, ४१.६%, ३९.८% व ३७.३% असून २९.५% शेतमजुरांना इतर सरकारी योजनांसंबंधी माहिती आहे.

उपरोक्त माहितीवरून असे निदर्शनास येते की यवतमाळ जिल्ह्यातील बहुतांश शेतमजुरांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (MGNREGA) यासंबंधी माहिती आहे.

## निष्कर्ष

यवतमाळ जिल्ह्यातील बहुतांश शेतमजुरांना शेतमजुरांसाठी असलेल्या सरकारी योजनांची माहिती आहे. बहुतांश शेतमजुरांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (MGNREGA) बाबत माहिती आहे. त्यांना बहुतेक वेळा मित्र किंवा नातेवाईकांद्वारे सरकारी योजनांची माहिती मिळते. सर्वाधिक शेतमजुरांनी सरकारी योजनेतून लाभ मिळवण्यासाठी अर्ज केले आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (MGNREGA) अंतर्गत देखील अनेक शेतमजुरांनी लाभासाठी अर्ज केले आहेत. बहुतांश शेतमजुरांना योजनेचा लाभ घेण्यासाठी अडचणी आल्या आहेत. बहुतांश शेतमजुरांचेजीवन सुधारण्यासाठी सरकारी योजना उपयुक्त आहेत. बहुतांश शेतमजुरांना सर्व शेतमजुरांपर्यंत योजना समान प्रमाणात पोहोचत आहे असे वाटत नाही.

## संदर्भ:


1) Behere, P.B., & Behere, A.P. (2008). "Farmers' suicide in Vidarbha region of Maharashtra State: A sociological study." Indian Journal of Psychiatry, 50(3), 124-127.
2) Tupe, S., & Joshi, V. (2019). "Trends in Agriculture of Yavatmal Maharashtra (India): District Level Analysis." Research Institute Publications, pp. 5-18.

3) Breman, J. (1978). Landless Labour and the Rural Economy: Social Change and Rural Labour in India. Oxford University Press, pp. 157-180.
4) Shambharkar, Y. (2018). "Knowledge and adoption behavior of Bt cotton growers about integrated nutrient management practices in Yavatmal district of Vidarbha region." International Journal of Agriculture and Environmental Research, 22(2), 22-39.
5) Santosh Gandhi, & Lahoti, J. (2014). "Agricultural labor migration: Case study from Vidarbha, Maharashtra." Journal of Rural Development, 33(3), 243-262.
6) Kale, P.S., Chatse, D.B., & Perke, D.S. (2023). "Economic analysis of socio-economic characteristics and land use pattern of large farmers in Yavatmal district, Maharashtra." Indian Journal of Agricultural Sciences, 12(4), 867-872.
7) Devra, V., & Kale, R. (2016). "Wage Patterns and Land Ownership among Farm Labourers in Yavatmal." Indian Labour Review, 12(3), 211-226.
8) More, D., & Suryavanshi, R. (2012). "Credit and Indebtedness of Farm Workers in Vidarbha." Financial Inclusion Journal, 6(3), 127-138.